वरीष्ठ सहाय्यक (लिपिक) गट-क या संवर्गातील कर्मचा-यांना कनिष्ठ प्रशासन अधिकारी गट-क या पदावर पदोन्नती देणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर

सामान्य प्रशासन विभाग-१

जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-२/४५१/२०२६.

अहिल्यानगर दि. /०७/२०२६
०९/१०/२०२६

वाचा - १. ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र.एपिटी/प्र.क्र.१०००/ प्र.क्र. २०२५/आस्था-८ दि. ०५/०६/२००३.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ मधील परिशिष्ठ ९ नियम ५ (२)

३. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही२०१८/प्र.क्र.१५९/ का-१२ दि.०१/०८/२०१९.

४. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब दि. ०७/०५/२०२१.

६. पदोन्नती समिती इतिवृत्त दि.१०.११.२०२५

जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत वरिष्ठ सहाय्यक गट-क या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना कनिष्ठ प्रशासन अधिकारी गट-क या पदावर वेतनस्तर रुपये एस-१३ रु.३५४००-११२४०० मध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटीच्या अधिन राहुन खालील रकाना ५ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येत आहे. पदोन्नतीने दिलेली पदस्थापना ही संदर्भ क्र.४ मध्ये दिलेल्या सुचनेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुन तदर्थ पदोन्नतीने भरणेत येत आहे.

| अ. नं. | कर्मचा-याचे नांव | सध्याचे कार्यालय | निवडीचा प्रवर्ग | पदोन्नतीचे पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री.सचिन नारायण घोडके | शिक्षण विभाग, (माध्यमिक) | जेष्ठतेनुसार | पंचायत समिती कोपरगांव |

अटी व शर्ती

१. सदरची पदोन्नती ही मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या न्यायालयीन निर्णयांच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरती स्वरुपात पदोन्नती देणेत येत आहे.

२. सदर पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपाची असल्यामुळे पदोन्नतीच्या दिनांकापासून सेवाज्येष्ठतेचा हक्क सांगता येणार नाही.

३. शासन निर्णय दि. १/४/२०१०, दि. ०२/०३/२०१९ व शासन परिपत्रक दि. २८/०७/२०१४ मधील तरतुदींनुसार सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पहिला/दुसरा/तिसरा लाभ मंजूर केलेल्या कर्मचा-यांनी सदर पदोन्नती नाकारल्यास त्यांना देण्यात आलेला लाभ काढून घेण्यात येईल.

४. नेमणूकीचे ठिकाणी विहित कालावधीत हजर न झाल्यास तसेच नेमणूकीचे पदस्थापनेत बदल करणेसाठी कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधिल नियम ४ नुसार कारवाई करणेत येईल.

५. संबधीत कार्यालय प्रमुखांनी कर्मचा-यास पदोन्नतीने नियुक्तीचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी स्थानिक व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे. कार्यालयाची निकड विचारात घेऊन पदोन्नती देण्यात आलेली असल्याने सात दिवसाचे आंत पदोन्नतीच्या ठिकाणी हजर व्हावे अन्यथा सेवा जेष्ठता डावलली जाईल. तसेच सदरची पदोन्नती स्विकारत /नाकारत असले बाबतचे लेखी पत्र संबधिताने त्यांचे कार्यालय प्रमुखामार्फत सात दिवसांत सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर येथे सादर करावे.

६. सदरचे आदेशाची नोंद संबंधिताचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. 202610010400170 असा आहे.

आनंद भंडारी (भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.सचिन नारायण घोडके, वरीष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग (माध्यमिक),जि प अहिल्यानगर.

द्वारा - शिक्षणाधिकारी (माध्यमिक), शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद अहिल्यानगर.

२/- श्री.सचिन नारायण घोडके, वरीष्ठ सहाय्यक यांना पदोन्नतीच्या ठिकाणी हजर होणेकामी तात्काळ कार्यमुक्त करावे.

प्रत - १ शिक्षणाधिकारी (माध्यमिक), शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद अहिल्यानगर.

२ गटविकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगांव

३. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर .